पीएच.डी. संशोधन आराखडा

"परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य सुविधांचा तौलनीक अभ्यास"

सामाजिकशास्त्र शाखे अंतर्गत भूगोल विषयातील
पीएच.डी. (विद्या वाचस्पती) या पदवी करिता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
यास सादर केल्या जाणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

* संशोधक *
फड प्रल्हाद भगीरथराव
(एम.ए.,बी.एड्., एम.फिल., (भूगोल))

* मार्गदर्शक *
प्रा.डॉ.बी.जी.सोनवणे
(एम.ए.,पीएच.डी., (भूगोल))

* प्राचार्य *
शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ
ता.शिरुर जि.लातूर

* भूगोल संशोधन केंद्र *
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

फेब्रुवारी २०१६

प्रस्तावना :-

मानवाचे संपूर्ण जीवन निसर्गावर अवलंबून आहे. मानवाच्या मूलभूत गरजा त्यांच्या मानसिक गरजा सभोवतालच्या पर्यावरणाची निगडीत असतात. मानवाच्या आपल्या जीवनात व्यक्ती-व्यक्तीचे संबंध चांगले असणे विकसित जीवनाचे लक्षण आहे. मानवाच्या आदिकाळात त्याचे जीवन प्राथमिक गरजा पूर्तीसाठीच खर्च होत असे. तेंव्हा अतिशय सामान्य प्राथमिक हालचाली आणि निसर्गाचे असामान्य पातळीवरचे उपायोजना त्यांच्या जीवनविषयक गरजा पूर्ण करीत असे. काळाबरोबरच मानवाचा विकास होत गेला. पर्यावरणाची एकरुप होण्याचा प्रयत्न सुरु झला आणि अनुकूल नैसर्गिक पर्यावरणाला मानवाने पहिला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

पृथ्वीवर मानवाच्या उत्पत्तीपासून मानवाने स्वत:मध्ये अनेक बदल घडवून आणलेले आहेत. पृथ्वीवरील विविध वर्गीय जीवनामध्ये सत बदल होत असतात. जीवांचा विचार केला असता प्राणी, वनस्पती, सुक्ष्मजीव हे जीव संहीतेत येतात. यामध्ये मानव हा प्राणी सर्व प्राण्यापेक्षा श्रेष्ठ प्राणी म्हणून गणला जातो. कारण मानवाकडे असलेल्या विचार करण्याचा प्रचंड सामान्यामध्ये मानव स्वत:मध्ये सतत परिवर्तन घडवून आणत असतो. विविध वर्गीय प्राण्यावर प्राथमिक पर्यावरणाचा परिणाम दिसून येतो. मानवावरही त्याचा परिणाम झालेला दिसून येतो. मानवावर प्राथमिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाचा परिणाम होतो. मानव या दोन्ही घटकांची सांगड घालून आपली श्रेष्ठता सिध्द करीत असतो.

मानवाच्या वेशभूषा, आहार, विहार, राहणीमान, आरोग्य या सर्वावर भौगोलिक पर्यावरणाचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे प्रामुख्याने आरोग्याच्या दृष्टीने विचार केला असता मानवाचे आरोग्य तापमान, आर्द्रता, पर्जन्य,मृदा, प्राणी, सूर्यप्रकाश, भूपृष्ठ रचना, रुढी, परंपरा या सर्वांवर अवलंबून असते. यामुळे मानवाच्या आरोग्याचा अभ्यास भौगोलिक दृष्टीकोनातून करणे महत्त्वाचे ठरते. आरोग्य ही मानवाला लाभलेली अनमोल देणगी आहे. आरोग्यावर भौगोलिक घटकांचा कशा प्रकारे प्रभाव पडतो याचे विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक आहे. मानव आपला आरोग्यविषयी अत्यंत जागरुक असतो. अनेक वर्षांपासून मानव आपल्या आरोग्याची काळजी घेत आहे व यासाठी विविध उपचार पध्दतीचा उपचार करीत असतो.

१. आरोग्य भूगोलाचा अर्थ :

भूगोलामध्ये विसाव्या शतकाच्या मध्यापासून फार मोठ्या प्रमाणात क्रांती घडून आली आहे. भूगोलातील विविध अभ्यास विषयावर गहन अध्ययनावरुन अनेक शास्त्रांची उत्पत्ती झाली आहे. त्यामधील मानवी भूगोलाची उपशाखा म्हणून आरोग्य भूगोलाची उदय आज आरोग्य भूगोल ही मानवी आरोग्य आणि पर्यावरण यांच्यातील आंतरक्रियांचा भौगोलिक अभ्यास करते.

मानवावर ज्या भौगोलिक घटकांचा असा प्रभाव पडतो त्याच प्रमाणे त्या क्रिया करण्यासाठी जे मानवाचे आरोग्य सुदृढ असायला पाहिजे. त्या आरोग्यावर ही भौगोलिक घटकांचा प्रभाव असतो. त्यासाठी मानवी जीवन सुखकर होण्यासाठी किंवा जीवन चांगल्या प्रकारे पूर्ण होण्यासाठी आरोग्य भूगोलाचा खुप मोठया प्रमाणावर विकास होण्याची गरज असते व ती गरज विसाव्या शतकाच्या मध्यापासून पुढे पूर्ण झ ालेली आपणास दिसून येते. जर मानवाचे आरोग्य हे चांगले किंवा सुदृढ असेल तरच तो मानव जास्त काळ जगू शकतो. त्यासाठी आरोग्याचा भूगोलाचा अभ्यास करणे ही काळाची गरज असलेली आपणास दिसून येते. मानवाच्या जेंव्हा आरोग्याचे महत्त्व पटले तेंव्हापासून आरोग्य भूगोलाचा विकास हा भरभराटीला आलेला आपणास दिसून येतो.

२. आरोग्य भूगोलाच्या व्याख्या -

आरोग्य भूगोलाच्या व्याख्या अनेक शास्त्रज्ञांनी केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) J.F. Williams :

"Health is the quality of life that enables the individuals to like most and to serve best."

"आरोग्य हे मानवी जीवनाचे एक गुणतत्व आहे. जे की, व्यक्तिमत्त्वाला प्रभावी बनवते व उत्कृष्टता प्रदान करते."

२) John Hunter :

"The application of Geographical concept and techniques to health related problems can be called medical geography."

"आरोग्य समस्यांच्या संबंधीत ज्या काही भौगोलिक संकल्पना व कौशल्य आहे, याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे आरोग्य भूगोल होय."

३) Webster Dictornary :

"Health is the state of being heel and sound in body. Mind or soul specially from physical disease or pain."

"सुदृढ व निरोगी शरीर म्हणजे आरोग्य होय. विशेषत: मन किंवा आत्मा हे शारीरिक रोग व व्याधीपासून मुक्त असले पाहिजेत."

४) "In reality medical geography is a multimentional body of knowledge and at the same time multificeted approach gnarled to words understanding spatial aspect of human health problems..."

Grakd F. Pyle Applied Geography, १९७९, New York.

"आरोग्य भूगोल ही एक आरोग्याची अभ्यास शाखा असून यात आरोग्य, आजार आणि रोग यांचा अभ्यास केला जातो. यांच्या तीन महत्त्वाच्या वर्गामध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते. यात मानवी रोगांचे वर्गीकरण, आरोग्याचे योगदान आणि भौगोलिक पर्यावरणाचे पृथ्थकरण आणि त्यांचा आरोग्यावर होणारा अपेक्षित आहे."

५) "आरोग्य ही भूगोल ही वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य यांचा साध्या सहजसाध्य वागण्याच्या पध्दतीबाबत अभ्यास करणारी एक शाखा आहे."

६) "ज्या विषयात वैयक्तीक स्वच्छता व आरोग्याचे साधे नियम पाळणे बहुतांश रोग निर्माण होतात. त्या निर्माण होणाऱ्या लोकांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे आरोग्य भूगोल होय."

३. आरोग्य भूगोलाचा विकास :

मानवाच्या उत्पत्तीपासून भूगोलाची सुरुवात झाली आहे असे समजले जाते आणि तेंव्हापासूनच भूगोलात मानवासाठी योग्य वातावरणाचा अभ्यास येऊ लागला म्हण्जोच तेंव्हापासून कमी अधिक प्रमाणात भूगोलाचामध्ये आरोग्य भूगोलाचा अभ्यास होऊ लागला. पण खऱ्या अर्थाने १७ व्या शतकात या शाखेची

चर्चा केली जाऊ लागली. याच काळात आरोग्य भूगोलाचा I तत्त्वेत्ता जे.एम.हावे यांनी आंतरराष्ट्रीय भूगोल परिषदेमध्ये भूगोलाशी निगडीत एका शोध निबंधाचे वाचन केले आणि त्या शोध निबंधाचे विविध रोगांसाठी अभिक्षेत्रीय भिन्नतेचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे, असे मत मांडण्यात आले.

आरोग्य भूगोलाने मानवी आरोग्य सुधारण्यासाठी अनेक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. यात सांसर्गिक रोगांचा प्रतिबंध व निर्मुलन, पर्यावरण स्वच्छतेत सुधारणा, पोषणाच्या दर्जात सुधारणा, लोकसंख्या नियंत्रण व ग्रामीण आरोग्यात सुधारण आदींसाठी राबवण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य भूगोलाचे महत्त्वाचे स्थान आहे. सर्व मानवाला आरोग्याचे ज्ञान असलेले आपणास समजते ते फक्त आरोग्य भूगोलामुळेच. या आरोग्य भूगोलामुळे सर्व मानवाला आरोग्याचे महत्त्व समजून सांगितले जाते व जर आरोग्य सुंदर किंवा उत्कृष्ट राहिले तर मानव हा जास्त काळ जीवन जगू शकतो व आरोग्य कसे ठेवावे, याचे सर्व ज्ञान हे मानवाला आरोग्य भूगोलामूळे माहित झाले.

४. पर्यावरण आणि आरोग्य :

मानवाच्या सभोवताली आढळणारे सजीव व निर्जीव तसेच द्रव्य व अद्रव्य इ. बाह्य घटक म्हणजेच पर्यावरण होय. पणी व जमीन हे पर्यावरणाचे मुख्य घटक असले तरी आधुनिक घटक म्हणजेच पर्यावरण होय. पाणी व जमीन हे पर्यावरणाचे मुख्य घटक असले तरी आधुनिक संकल्पनेप्रमाणे त्यात सामाजिक तसेच आर्थिक परिस्थितीचा अंतर्भाव केला जातो.

पर्यावरणाचे परस्परांशी निगडीत असे तीन घटक आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) भौतिक :

पाणी, हवा, जमीन, केरकचरा किरणोत्सर्ग इत्यादी

२) जैविक :

वनस्पती व प्राणी जसे जिवाणू, विषणू, कीटक तीक्ष्ण दंत प्राणी इत्यादी.

३) सामाजिक :

रुढी, संस्कृती, सवयी, उत्पन्न, व्यवसाय, धर्म इत्यादी

मानवाच्या आरोग्य तसेच वाढीवर विपरीत परिणाम करणाऱ्या भौतिक पर्यावरणातील अनेक घटकांचे नियंत्रण यालाच जागतिक आरोग्य संघटनेने पर्यावरणाची स्वच्छता असे म्हटले आहे. यालाच आज काल पर्यावरणाचे आरोग्य असे म्हणतात.

भारतातील बऱ्याचशा रोगांचे मुळ अस्वच्छ पर्यावरणात सापडते. पिण्यास अयोग्य पाणी, प्रदुषित जमीन, इतस्तत: विखुरलेली मानवी विष्ठा व कचरा, कोंदट केर, किटक तसेच उंदीर, घुशीसारखे प्राणी पर्यावरण अस्वच्छ होण्यास कारणीभूत ठरतात. बऱ्याचशा शहरांमध्ये हवेच्य प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाढलेले मृत्यूचे प्रमाण, एक वर्षाखालील बालकांचे मृत्यू, आजार आणि खालावलेली आरोग्य स्थिती हे बिघडलेले पर्यावरण आरोग्याचे दुष्परिणाम होत. म्हणूनच मानव व समाज यांच्या आरोग्य संवर्धनासाठी तसेच रोग प्रतिबंधनासाठी पर्यावरण स्वच्छ राखणे अत्यंत आवश्यक आहे.

५. आरोग्याचा अर्थ :

आरोग्य ही एक व्यापक संकल्पना आहे. आरोग्य म्हणजे काळ शारीरिक सुदृढता नसून शारीरिक, मानसिक, भौतिक व सामाजिक सुदृढता होय. विविध आरोग्य तज्ञांनी आरोग्याच्या विविध व्याख्या मांडले ल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) "आरोग्य केवळ शरीरकि व मानसिक सुदृढता नसून शरीराला कोणत्याही रोगापासून दूर ठेवणे होय." - जागतिक आरोग्य संघटना.

२) J.F. Williams : According to Williams - "Health is the quality of life that enables the individuals to live most and to serve best."

३) W.H.O. :

"Health is the state of complete physical, mental & social well being and not only the absence of disease or infirmity."

४) Webster Dictionary :

"Health is the ste of being heel and sound in body. Mind or sould specially from phsycial disease or pain."

५) "मानवी शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्टीने आरोग्य वर्धन करणे आणि ही निरोगी स्थिती कायम राखणे, यालाच आरोग्य असे म्हणतात."

६) "मानवी जीवनात निर्माण होणारे रोग टाळता येणाऱ्या परिस्थितीमुळे होणाऱ्या आजारांचा प्रतिबंध करणे म्हणजे आरोग्य होय."

७) "मानवी आजार व अपंगत्व नसणे म्हणजे आरोग्य नसून आरोग्य ही शारीरिक, मानसिक व सामाजिक दृष्ट्या संपूर्ण सुदृढतेची अवस्था म्हणजे आरोग्य होय."

८) "जनसामान्यांच्या पोषणाचा व राहणीमानाचा दर्जा उंचावणे व सार्वजनिक आरोग्यास सुधारणा घडवून आणणे म्हणजे आरोग्य होय."

९) "आरोग्य ही मानवाच्या केवळ व्यक्तिगत फायद्याची बाब नसून संपूर्ण समाजाची संपत्तीच आहे. म्हणून तिचे रक्षण करणे म्हणजे आरोग्य होय."

६. आरोग्याचे नियम :

मानवाचे आरोटय संतुलीत राहण्यासाठी काही नियमांचे पालन करावे लागते, ते पुढीलप्रमाणे

१) सतत उपवास करु नये.

२) दैनंदिन जीवनात नियमितता बाळगावी.

३) मानवाला पिण्याचे पाणी स्वच्छ असले पाहिजे.

४) मानवाने नित्य नियमाने व्यायाम केल्यास आरोग्य उत्तम, सुदृढ राहते.

५) आरोग्य सेवा-सुविधांचा वापर योग्य वेळी करणे.

६) मानवाचे शरीर सुदृढ ठेवण्यासाठी पोषक आहाराची गरज असते.

७) एका वेळेस जास्तीत जास्त जेवण न करणे.

८) झोपताना जास्त वेळ डाव्या उशीवर व पाठीवर झोपावे.

९) अन्न सेवन करताना पौष्टिक पदार्थ खावे.

१०) दुषित व अस्वच्छ भागापासून दूर राहणे.

७. आरोग्य उपचार पध्दती :

मानव पूर्वीपासून आपल्या आरोग्याची काळजी स्वतः घेत आलेला आहे. त्यासाठी त्याने विविध पध्दतीचा वापर केला आहे. विविध प्रदेशात किंवा विविध देशात वेगवेगळ्या उपचार पध्दतींचा वापर केला जातो. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) भारतीय चिकित्सा पध्दत :

भारतामध्ये विविध साधुसंतांनी आपल्या जप आणि तपाचा जोरावर विविध औषधी वनस्पतींचा शोध लावलेला आहे. भारतीय वैद्यशास्त्रामध्ये जीवक व शास्त्रज्ञाने मोलाचे कार्य केलेले आहे. औषध व उपचार पध्दतीचा खरा प्रारंभ भारतामध्ये झालेला आहे. त्यात प्रामुख्याने आयुर्वेद व सिध्द पध्दतीचा विकास करण्यात आला. हळूहळू या पध्दतीचा विकास वाढत जाऊन विविध देशांमध्ये याचा प्रचार व प्रसार झालेला आपणास दिसून येतो. सिध्द पध्दती प्रामुख्याने तामीळ भाषेतून प्रसारीत झालेली आहे.

आयुर्वेद पध्दती व सिध्द पध्दती या दोन्ही उपचार पध्दती समान होत्या. परंतू आयुर्वेदाला जीवनशास्त्र आणि आरोग्य हे जीवन असे म्हटले जाते. पुर्वी वैदक काळामध्ये आयुर्वेदाचा उगम झला. वैदीक युगातील चार ग्रंथापैकी आथर्व वेदांमध्ये आयुर्वेदाचा प्रामुख्याने उल्लेख आढळतो. आयुर्वेदातील भारतातील प्रथम आरोग्य शिक्षक व वैद्य तक्षशीला या विद्यापीठात राहत होते.

भारतामध्ये रॉकफेलर फाउण्डेशनचे आपल्या कार्यास सुरुवात केली. मानव जातीच्या सुस्थितीत वृध्दींगत करणे हा या फाउण्डेशनचा हेतू आहे. भारतातील अनेक वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमांशी रॉकफेलर फाउण्डेशन निगडीत आहे. रॉकफेलर फाऊंडेशनच्याच आर्थिक मदतीने कलकत्ता येथील अखिल भारतीय सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता संस्था आहे. तसेच पुणे येथील विषाणू संशोधन संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

फोर्ड फाउण्डेशनच्या आर्थिक मदतीने सिंगुर, नजाकघर पुनामल्ले या ठिकाणी ओरिएन्टेशन प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. त्या केंद्रामध्ये भारतातल्या सर्व ठिकाणाचा वैद्यकीय तसेच संलग्न वैद्यकीय व्यक्तींना सार्वजनिक आरोग्याबाबत संस्था स्थापन केल्या.

आयुर्वेदात प्रामुख्याने नाडी परीक्षणाला महत्त्व होते. नाडी परीक्षणावरुन वात, पित्त, कफ या तीन रोगांचे निदान केले जात असे. भारतीय चिकित्सा पध्दती जागतिक पातळीवर श्रेष्ठ मानली जाते.

८. अभ्यास क्षेत्रातील आरोग्य सुविधा :-

अभ्यास क्षेत्रातील परभणी व गंगाखेड तालुक्यामध्ये विविध आरोग्य सेवा सुविध उपलब्ध आहेत. या सेवा प्रामुख्याने ॲलोपॅथीक व आयुर्वेदिक प्रकारच्या आहेत. परभणी व गंगाखेड तालुक्यात ॲलोपॅथीक या आरोग्य सुविधांचा विकास खुप मोठ्या प्रमाणात झालेला आहे. ॲलोपॅथीक प्रकारच्या सेवा सुविधा शासनाकडून व खाजगी क्षेत्राकडून ॲलोपॅथीक सेवा सुविधा मोठ्या प्रमाणात प्रदान केलेल्या आहेत. ॲलोपॅथीक आरोग्य सुविधांच्या तुलनेत आयुर्वेदिक सुविधांचा विकास खूपच कमी प्रमाणात झ ाालेला आहे.

परभणी व गंगाखेड तालुक्यात शासकीय रुग्णालय मोठ्या प्रमाणात आहेत. परभणी मध्ये जिल्हा रुग्णालय व गंगाखेडमध्ये उपजिल्हा रुग्णालय आहे व त्यांच्या अंतर्गत प्राथमिक केंद्र आहेत. त्याचबरोबर व तालुक्यात ग्रामीण भागात सुध्दा खाजगी आरोग्य सुविधा स्थापन झालेल्या दिसून येतात. त्यामध्ये परभणी तालुक्यात पोखर्णी (नृ.) व दैठणा या ठिकाणी पिंगळी, धर्मापुरी, शिंगणापूर तर गंगाखेड तालुक्यात राणीसावरगाव या ठिकाणी खाजगी आरोग्य केंद्र आहेत. त्यानंतर इसाद, झोला, महातपुरी या गावात खाजगी आरोग्य केंद्र आढळून येतात.

परभणी व गंगाखेड तालुक्यातील बहुतांशी लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करत असल्यामुळे शासकीय आरोग्य सुविधांचा वापर अधिक झालेला आपणास दिसून येतो. त्याच बरोबर खाजगी ॲलोपॅथीक आरोग्य सुविधांचाही वापर लोकसंख्या करते.

९. उद्दिष्टये :-

सदरील संशोधन आराखडा पूर्ण करण्यासाठी संशोधकाने काही उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवलेली आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) परभणी व गंगाखेड तालुक्यातील उपलब्ध आरोग्य सुविधा केंद्रातील तफावत दर्शविणे.

२) परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य सुविधांचा कल व त्यात झालेला बदल अभ्यासणे.

३) परभणी व गंगाखेड तालुक्यातील अभ्यास क्षेत्रातील शासकीय आरोग्य सुविधा केंद्राचे वितरण अभ्यासणे.

४) परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य सुविधा केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या पदसंख्येचा अभ्यास करणे.

५) अभ्यास क्षेत्रातील विविध संसर्गजन्य, विषाणु जन्य, जिवाणुजन्य रोगांचा व त्यांच्या पारंपारिकेतचा आणि वितरणाचा अभ्यास करणे.

१०. सांख्यकीय माहिती :-

प्रस्तुत शोध संशोधन आराखड्याची माहिती प्राथमिक आणि द्वितीय आधार सामुग्रीच्या माध्यमाने आणि जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन परभणी व इ.स.२००१ व इ.स.२०११ या वर्षीच्या कॉन्सीअर्स हँडबुक मधून घेण्यात आलेली आहे.

प्राथमिक निरीक्षणात उपजिल्हा रुग्णालय गंगाखेड तसेच जिल्हा रुग्णालय, परभणी, प्राथमिक आरोग्य सुविध केंद्राचा समावेश आहे. दुय्यम स्वरुपाची माहिती ही जिल्हा परिषद, आरोग्य विभाग परभणी व ताक्या आरोग्य कार्यालय गंगाखेड तसेच तहसील गंगाखेड व परभणी तहसील या ठिकाणाहून मिळविलेली आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालय गंगाखेड या ठिकाणाहून सुध्दा माहिती मिळविलेली आहे.

११. अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोध संशोधन आराखड्याची प्राथमिक आणि दुय्यम स्वरुपाच्या माहितीचे विश्लेषण आलेख सांख्यिकीय तक्ते, टिंब पध्दतीचा नकाशा व विविध सांख्यिकीय आकडेवारीच्या सहाय्याने दर्शविले आहे. आरोग्य सुविधा केंद्राचे वितरण हे टिंब पध्दतीच्या सहाय्याने आणि विशिष्ट सुचीच्या आधारे दर्शविले आहे. तसेच आरोग्य सुविधा केंद्रातील अंतर निअरेस्ट नेईबर यांनी सांगितलेल्या पध्दतीने दर्शविण्यात येते.

१२. मर्यादा :

परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य सेवांचा भौगोलिक अभ्यास करीत असताना काही मर्यादा येतात. त्या पुढीलपमाणे आहेत.

१) प्रस्तुत शोध संशोधन आराखडा संपूर्ण रोगांपैकी केवळ संसर्गजन्य, विषाणुजन्य व जिवाणुजन्य रोगांचाच अभ्यास करण्यात आलेला आहे.

२)	प्रस्तुत शोध संशोधन आराखड्यात केवळ शासकीय आरोग्य सुविधांचा समावेश करण्यात आलेला आहे.

३)	प्रस्तुत शोध संशोधन आराखड्यात खजगी आरोग्य सुविध केंद्र, आयुर्वेदिक व खाजगी युनानी केंद्राचा समावेश करण्यात आलेला नाही.

४)	परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य सुविधा केंद्रातून सर्व कर्मचाऱ्यांच्या पदसंख्यची माहिती प्रत्यक्ष उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे जिल्हा रुग्णालय परभणी व उपजिल्हा रुग्णालय गंगाखेड व प्राथमिक आरोग्य केंद्र गंगाखेड यांच्या आरोग्य कार्यालयातील माहितीवर अवलंबून रहावे लागत आहे.

५)	प्रस्तुत शोध संशोधन आराखड्यातील रोगांची माहिती प्रत्यक्षात प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र या ठिकाणाहून उपलब्ध झालेली नसून उपजिल्हा रुग्णालय गंगाखेड व जिल्हा रुग्णालय परभणी या कार्यालयातून माहितीवर अवलंबून रहावे लागत आहे.

**१३.	विषयाची निवड :**

प्रस्तुत शोध संशोधन आराखडा तयार करण्यासाठी परभणी व गंगाखेड तालुक्याचा विचार केला आहे. कारण परभणी हा तालुका गोदावरी नदीपासून निर्माण झालेल्या रेगुर काळ्या व सुपीक मैदानी प्रदेशाचा भाग आहे. गंगाखेड तालुका हा काही प्रमाणात सुपीक मृदा असून काही प्रमाणात डोंगराळ भाग आहृे तर परभणी तालुका सुपीक व गंगाखेड हा तालुका परभणी तालुक्यापेक्षा कमी विकसीत आहे. त्यामुळे विकसीत तालुक्यात व अविकसित तालुकयात आरोग्य सुविधांचा कोणत्या प्रमाणात विकास झाला आहे हे तपासून पाहण्यासाठी संशोधकावर त्या दोन्ही तालुक्यातील आरोग्याच्या कोणत्या समस्या आहेत या पाहण्यासाठी या दोन तालुक्यांची त्यांनी निवड केलेली आहे.

परभणी तालुका हा गंगाखेड तालुक्यापेक्षा मोठ्या प्रमाणात विकसित आहे. त्याचा आरोग्यावर काय परिणाम जाणवतो की नाही व आरोग्याच्या बाबत परभणी व गंगाखेड तालुक्यातील कोणत्या तालुक्याचा विकास झाला आहे हे कोणता तालुका अविकसित आहे त्याचे कारणे शोधून त्यावर उपाय शोधण्यासाठी किंवा त्याचा अभ्यास करण्यासाठी दोन तालुक्याचा विचार केला आहे.

प्रकरण आराखडा

"परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य सुविधांचा तोलनीय अभ्यास" खालील प्रकरणांच्या सहाय्याने करण्यात येणार आहे.

प्रकरण १ ले : संकल्पनात्मक आराखडा

१) प्रस्तावना

१.१ लोकांचे आरोग्य

१.२ आयुष्यमान

१.३ अन्न

१.४ आरोग्य सुविधा

१.५ आरोग्य केंद्र (दोन्ही तालुक्यातील)

२) विषयाची निवड

३) उद्देश

४) संशोधन पध्दती

५) सांख्यकीय माहिती

६) गृहीतके

७) यापूर्वी अशा विषयावर झालेले काम

८) अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा

९) पाठाची रचना

प्रकरण २ रे : परभणी व गंगाखेड तालुक्यातील भौगोलिक पार्श्वभूमी

१) परभणी व गंगाखेड

२) प्राकृतिक रचना

३) जमीन/मुद्दा

४) हवामान

५)	शुध्द हवा

६)	वनस्पती

७)	पाणी

८)	नदीप्रणाली

९)	पिके

प्रकरण ३ रे : आर्थिक व सांस्कृतिक माहिती (दोन्ही तालुक्यातील)

१)	जलसिंचन

२)	आर्थिक प्रगती

३)	लोकसंख्या

४)	पाणी पुरवठा योजना

५)	पशुधन

६)	राहणीमान व समारंभ

७)	साक्षरता

प्रकरण ४ थे : परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य सुविधा केंद्र व त्यात झालेली पाठ यांचे अभिक्षेत्रीय वितरण

१)	परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य केंद्र २००१

२)	परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य केंद्र २०११

३)	सुविधा

प्रकरण ५ वे : परभणी व गंगाखेड तालुक्यातील आरोग्य सुविधा केंद्रातील कर्मचाऱ्यांचे आकृतीबंध

१) डॉक्टर

२) परिचारिका

३) आरोग्य कर्मचारी

४) प्रशिक्षित दाई

५) आरोग्य सहाय्यक

६) औषध निर्माता

७) प्रयोग शाळा तंत्रज्ञ

८) क्ष-किरण तंत्रज्ञ

९) प्रयोगशाळा सहाय्यक

१०) पहारेकरी

११) सेवक

१२) आचारी

१३) स्विपर

प्रकरण ६ वे : परभणी व गंगाखेड तालुक्यात उद्‌भवणारे रोग व त्यांची कारणे उपचार पध्दती व रोगांचा आढावा.

१) रोग या संकल्पनेची व्याख्या

२) रोगांचा इतिहास

३) रोगांचे वर्गीकरण

४) परभणी व गंगाखेड तालुक्यात वारंवार होणारे रोग आणि त्यांची स्थिती

प्रकरण : ७

१) निरिक्षण

२) सारांश

३) शिफारस

४) निष्कर्ष

५) संदर्भ ग्रंथ

६) परिशिष्ट्ये

संशोधक

फड प्रल्हाद भगीरथराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बी.जी. सोनवणे

प्राचार्य

शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ

ता.शिरुर जि.लातूर